आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता

१ ऑगस्ट २०२५ - शुक्रवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- उपराष्ट्रपती पदासाठी ९ सप्टेंबरला मतदान

- महसूल दिनानिमित्त राज्यभरात विविध कार्यक्रमांचं आयोजन

- नाळ २, श्यामची आई आणि आत्मपॅम्पलेट चित्रपटांना राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार जाहीर

आणि

- अँडरसन-तेंडुलकर कसोटी क्रिकेट मालिकेतल्या पाचव्या सामन्यात भारताचा पहिला डाव २२४ धावात आटोपला.

**<><><><>**

नव्या उपराष्ट्रपतींची निवड करण्यासाठी भारत निवडणूक आयोगानं आज निवडणूक कार्यक्रम जाहीर केला. येत्या ७ ऑगस्टला निवडणुकीसाठीची अधिसूचना जारी होईल. २१ ऑगस्टपर्यंत उमेदवारी अर्ज भरण्याची मुदत राहील तर ९ सप्टेंबरला मतदान होणार असल्याचं आयोगानं कळवलं आहे.

जगदीप धनखड यांनी राजीनामा दिल्यानंतर हे पद रिक्त झालं आहे. आयोगानं या निवडणुकीसाठी मतदार संघातल्या सदस्यांची यादी अद्ययावत केली आहे. संसदेच्या दोन्ही सभागृहांचे सदस्य उपराष्ट्रपती निवडतात.

**<><><><>**

सध्या मंत्रिमंडळात दुसरा कोणताही बदल करण्याचा विचार नसल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी स्पष्ट केलं आहे. माणिकराव कोकाटेंसंदर्भात जो रोष होता, तो पाहता आपण दोन्ही उपमुख्यमंत्र्यांशी चर्चा करून हा खातेबदल केल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी सांगितलं.

यवतमध्ये एका व्यक्तीने ठेवलेल्या एका आक्षेपार्ह स्टेटसमुळे तणाव निर्माण झाला आणि लोक रस्त्यावर आले. जमावाला पांगवण्यासाठी लाठीमार करावा लागला. मात्र आता परिस्थिती नियंत्रणात असून तणाव संपवण्याचा प्रयत्न सुरू आहे. या प्रकरणाची चौकशी केली जाईल. कुणीही कायदा हातात घेऊ नये, असं आवाहन मुख्यमंत्र्यांनी केलं आहे. जे कुणी तणाव निर्माण करण्याच्या हेतूने समाज माध्यमावर स्टेटस ठेवतील त्यांच्यावर कठोर कारवाई केली जाईल, असंही फडनवीस यांनी स्पष्ट केलं.

काही दिवसांपूर्वी घडलेल्या घटनेवर यवत बाहेरच्या एका व्यक्तीने मोबाईलवर शेअर केलेल्या स्टेटसमुळे हा प्रकार घडला आहे. सध्या, यवतमधली परिस्थिती नियंत्रणात आली आहे. अधिकचा पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला असून कुणीही अफवांवर विश्वास ठेवू नये, असं आवाहन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केलं आहे. माध्यमांनीही जबाबदारीने वार्तांकन करावं असं आवाहनही पवार यांनी वार्ताहरांना केलं.

<><><><><>

महसूल विभागानं विकासकामं लोकाभिमुख, पारदर्शक आणि गतीमानतेसह, वेळेत पूर्ण करण्याचा प्रयत्न करावा असं उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी म्हटलं आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत आज पुण्यात महसूल सप्ताहाचा शुभारंभ झाला त्यावेळी ते बोलत होते. महसूल विभागानं कोणत्याही प्रबोलनाला बळी पडून नये, असं आवाहन त्यांनी अधिकाऱ्यांना केलं.

महसूल सप्ताहाच्या प्रारंभानिमीत्त राज्यात इतर ठिकाणीही कार्यक्रमांचं आयोजन केलं गेलं.ठाण्यात राज्याचे महसूल विभागाचे अपर मुख्य सचिव डॉ.विकास खारगे आणि कोकण विभागीय आयुक्त डॉ.विजय सुर्यवंशी यांच्या उपस्थितीत कार्यक्रम झाला. महसूल विभाग इतर सर्व लोकांना न्याय मिळेल अशी विश्वासार्हता निर्माण करणं ही सर्व कर्मचारी आणि अधिकाऱ्यांची जबाबदारी

असल्याचं त्यांनी सांगितलं. नाशिकमध्ये झालेल्या कार्यक्रमात विभागीय आयुक्त डॉ प्रवीण गेडाम यांनी महसूलदूत हा उपक्रम राबवण्याचा संकल्प व्यक्त केला. या उपक्रमाअंतर्गत जास्त लोकसंख्या असणाऱ्या गावांमध्ये महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना महसूलदूत म्हणून काम करण्याची संधी दिली जाणार आहे.

**हिंगोली आणि धुळे** इथं झालेल्या कार्यक्रमांत जिल्ह्यांमधल्या उत्कृष्ट कामगिरी केलेल्या अधिकारी कर्मचाऱ्यांना पुरस्कार देऊन सन्मानित केलं गेलं.

**यवतमाळमध्ये** पालकमंत्री संजय राठोड यांच्या उपस्थितीत कार्यक्रम झाला.

**सिंधुदुर्गात** झालेल्या कार्यक्रमात विविध दाखले वितरण आणि विशेष सहाय आर्थिक योजनेअंतर्गत लाभ वाटप उपक्रमाचं आयोजन केलं गेलं.

**<><><><>**

एसटी महामंडळ स्वतःच्या जागेवर विविध ठिकाणी सर्वसामान्यांसाठी पेट्रोल आणि डिझेल विक्री सुरू करणार आहे. परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी आज ही माहिती दिली. इंडियन ऑइल, भारत पेट्रोलियम आणि हिंदुस्तान पेट्रोलियम या तेल विक्री करणाऱ्या कंपन्यांशी लवकरच व्यावसायिक करार केला जाणार आहे.

**<><><><>**

कोल्हापुरी चपलेच्या जीआय टॅगची अधिकृत नोंदणीकृत मालकी लिडकॉम आणि लिडकर या महामंडळांकडेच असल्याचं दोन्ही महामंडळांनी स्पष्ट केलं आहे.

जूनमधे इटलीच्या प्रसिद्ध 'प्राडा' ब्रँडनं आयोजित केलेल्या फॅशन शोमध्ये मॉडेलनं घातलेल्या लेदर सँडल्सचं डिझाइन जीआय नोंदणीकृत कोल्हापुरी चप्पलसारखं होतं. त्यावर वकिलांच्या एका गटानं प्राडाविरुद्ध मुंबई उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल केली, न्यायालयानं ती फेटाळली. फक्त जीआय टॅगच्या नोंदणीकृत धारक म्हणजेच महाराष्ट्र आणि कर्नाटक चर्मोद्योग विकास महामंडळांनाच अशा प्रकारची दिवाणी कारवाई करण्याचा कायदेशीर अधिकार असल्याचं न्यायालयानं सांगितलं.

या पार्श्वभूमीवर, प्राडा किंवा तत्सम आंतरराष्ट्रीय संस्थांशी कोणत्याही प्रकारचे संवाद, चर्चा किंवा प्रतिनिधित्व करण्याचा अधिकार इतर कोणत्याही व्यक्ती अथवा संस्थेला नाही, असं दोन्ही महामंडळांनी स्पष्ट केलं आहे.

**<><><><><>**

प्रधानमंत्री किसान सन्मान योजनेच्या विसाव्या हप्त्याचं वितरण प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते उद्या होणार आहे. प्रधानमंत्री उद्या उत्तर प्रदेशात वाराणसीच्या दौऱ्यावर असतील. यावेळी प्रधानमंत्री किसान सन्मान योजने अंतर्गत नऊ कोटी ७० लाख शेतकऱ्यांना २० हजार ५०० कोटी रुपयांपेक्षा अधिक रक्कम वितरित केली जाईल. उत्तर प्रदेशातल्या २ हजार कोटी रुपये खर्चाच्या विविध विकास प्रकल्पांची पायाभरणी आणि उद्घाटनही मोदी यांच्या हस्ते होणार आहे.

**<><><><><>**

७१ व्या राष्ट्रीय चित्रपट पुरस्कारांमध्ये सर्वोत्कृष्ट बाल चित्रपटाचा पुरस्कार ‘नाळ २’ तर सर्वोत्कृष्ट मराठी चित्रपटाचा पुरस्कार ‘श्यामची आई’ चित्रपटाला जाहीर झाला आहे. नवोदित दिग्दर्शकाचा पुरस्कार आशिष बेंडे यांना ‘आत्मपॅमफ्लेट’ साठी जाहीर झाला आहे. नवी दिल्लीत झालेल्या वार्ताहर परिषदेत निवड समितीचे अध्यक्ष आशुतोष गोवारीकर यांनी हे पुरस्कार जाहीर केले.

सर्वोत्कृष्ट बाल कलाकारांचा पुरस्कार जिप्सीसाठी कबीर खंदारे, नाळ २ साठी त्रीशा ठोसर, श्रीनिवास पोकळे आणि भार्गव यांना मिळाला आहे.

12th fail हा राष्ट्रीय पातळीवरील सर्वोत्कृष्ट चित्रपट ठरला आणि या चित्रपटातला अभिनेता विक्रांत मेस्सी याला सर्वोत्कृष्ट अभिनेत्याचा पुरस्कार विभागून जाहीर झाला आहे. जवान चित्रपटासाठी शाहरुख खान यालाही सर्वोत्कृष्ट अभिनेत्याचा पुरस्कार जाहीर झाला आहे. सर्वोत्कृष्ट अभिनेत्रीचा पुरस्कार चॅटर्जी वर्सेस नॉर्वेसाठी राणी मुखर्जीला मिळणार आहे. सर्वोत्कृष्ट दिग्दर्शकालाचा पुरस्कार द केरळ स्टोरीचे दिग्दर्शक सुदीप्तो सेन यांना जाहीर झाला. याशिवाय सर्वोत्कृष्ट

सिनेमॅटोग्राफीचा पुरस्कारही याच चित्रपटाला मिळाला. शिल्पा राव सर्वोत्कृष्ट गायिका आणि PVNS रोहित सर्वोत्कृष्ट गायक ठरला.

**<><><><><>**

अँडरसन-तेंडुलकर कसोटी क्रिकेट मालिकेतल्या पाचव्या सामन्यात आज दुसऱ्या दिवशी भारताचा पहिला डाव २२४ धावात आटोपला. करुण नायरच्या ५७ धावा ही भारताच्या या डावातली सर्वोच्च वैयक्तिक खेळी ठरली. महंमद सिराज, आणि प्रसिद्ध कृष्णा शून्यावर बाद झाले. इंग्लंडतर्फे गस ॲटकिन्सननं ५, तर जोश टंगनं ३ गडी बाद केले.

शेवटची बातमी हाती आली तेव्हा इंग्लंडच्या ३ बाद १४७ धावा झाल्या होत्या.

**<><><><><>**

पोलिसांनी बनावट नोटा तयार करणारी टोळी पकडली असून, या टोळीकडून ५९लाख ५० हजार रुपयांच्या बनावट नोटा, आणि त्या तयार करण्यासाठीचं साहित्य जप्त केलं आहे. याप्रकरणी बीड, छत्रपती संभाजी नगर, आणि अहिल्यानगर या जिल्ह्यातल्या आरोपींना अटक करण्यात आली.

**<><><><><>**

महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसच्या अध्यक्षपदी शिवराज मोरे यांची तर प्रदेश एनएसयुआयच्या अध्यक्षपदी सागर साळुंखे यांची नियुक्ती झाली आहे.

**<><><><><>**

बीडहून नांदेड कडे निघालेल्या शिवशाही एसटी बसचा आणि रिक्षाचा अपघात होऊन रिक्षा चालकाचा मृत्यू झाला. ही  घटना आज सकाळी परळी नजीक पांगरी कॅम्प इथं घडली.

**<><><><><>**

लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या पुण्यतिथीनिमित्त आज त्यांना आदरांजली वाहिली जात आहे. केंद्रीय गृह मंत्री अमित शाह यांनी लोकमान्य टिळकांना आदरांजली वाहिली आहे. लोकमान्यांनी केलेल्या जनजागृतीच्या कार्याचा गौरव त्यांनी समाजमाध्यमावरच्या पोस्टमधे केला आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांनीही लोकमान्य टिळकांना आदराजंली वाहिली आहे.

टिळक पुण्यतिथीनिमित्त आज रत्नागिरीत टिळक आळी इथं त्यांच्या जन्मस्थळी त्यांना अभिवादन करण्यात आलं. जिल्हाधिकारी आणि जिल्हापरिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यावेळी उपस्थित होते. लोकमान्यांच्या जन्मघरात त्यांच्या जीवनचरित्रावर आधारित छायाचित्र प्रदर्शन आणि वस्तू असून, मान्यवरांनी त्याची पाहणी केली.

लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या पुण्यतिथीनिमित्त आज लोकमान्य टिळक ट्रस्टचा राष्ट्रीय पुरस्कार पुण्यात केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते देण्यात आला.

**<><><><><>**

लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त त्यांना अभिवादन करण्यात येत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज नागपूर इथं अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केलं. अण्णाभाऊ साठे यांनी दाखवलेल्या वंचितांच्या विकासाच्या मार्गावर राज्य शासन चालेल, असं ते यावेळी म्हणाले.

लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंतीनिमित्त मंत्रालयात कौशल्य विकास आणि उद्योजकता मंत्री मंगल प्रभात लोढा यांनी अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण केला. यावेळी अनेक वरिष्ठ अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी देखील अभिवादन केलं.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांनीही अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त त्यांना अभिवादन केलं.

**<><><><><>**

मुंबई क्रिकेट संघटनेचे माजी अध्यक्ष शरद पवार आणि प्रसिद्ध क्रिकेटपटू सुनील गावस्कर यांचा वानखेडे स्टेडिअमवर पुतळा उभारून या दोन्ही दिग्गजांचा सन्मान करण्याचा निर्णय मुंबई क्रिकेट संघटनेनं घेतला. नुकत्याच बंधण्यात आलेल्या संघटनेच्या संग्राहलायच्या प्रवेशद्वारावर हे पुतळे उभारले जाणार आहेत.

**//<><><><><>//**